# पु. ल. देशपांडे

पु. ल. देशपांडे --- मराठी साहित्यातला अष्टपैलू हिरा - नाटक, कथा, वक्तृत्व, व्यक्तीचित्रे, विनोदीसाहित्य ,प्रवासवर्णन कशातही कमी नाही. उत्स्फुर्त व्याख्याता, अनुपम नट. त्यांच्या परिचयाचे, कर्तृत्वाचे परिक्षण अशक्यच .त्यांच्या बहुविध प्रतिभेला सादर वंदन.

'वन्देमातरम', 'उमज पडेल तर', 'देवबाप्पा', 'गुळाचा गणपती'।
तुमच्या सिनेमाक्षेत्रातील कामाची नाही गणती॥
तुझे आहे तुजपाशी , सुंदर मी होणार, तीन पैशाचा तमाशा, ती फुलराणी।
अशी नाटकांची अमृतखणी॥
प्रवासाची अपूर्वाई गमती जमती सांगून जाई ।
पूर्वेचा प्रवास 'पूर्वरंग'मनी फुलतो कुतुहुलपूर्ण हास्यरंग॥
बटाट्याचीचाळ, असामी असामी, वा-यावरची वरात।
भिजे प्रेक्षकांच्या हास्यात आणि प्रयोग संपतात टाळ्यांच्या गजरात.॥
रावसाहेब, गटणे, नारायण, चितळे मास्तर।
व्यक्तीचित्र हुबेहुब असे की वाचताना गालात खुलते हसे॥,
तरिही मधेच पाणावतात डोळे,। वाटते लिहायचे हे कसले सोहळे॥
एकाचवेळी रिझवणे, हसवणे, रडवणे, त्यातूनही शिकवणे।,
असे समृध्द लिहिणे॥,
ही दैवी प्रतिभा सहजी कोणास न मिळणे।,
पूर्वजन्मीचे जणु संचित असणे॥
वाचत असता तुमचे लिखाण।,
वाटे 'मनीचे गूज' सांगताय कानात॥
व्यावहारिक ठसके फटके यांवरचे भाष्य।
घराचे बाधकाम दाखवणारा मित्र।
मालकिणीच लाडाचं कुत्रं।
वाचताना समृध्द होई आमचे अनुभवविश्व ॥.

इतके सगळे लिखाण पण भाषेत सहजता, अनुभव रोजच्यातलेच पण त्यावर विनोदी भाष्यता, अलंकारिक बोजड शब्द लिखाणात नसतात. सहज बोलावे तसे लिहित जाता म्हणून तुम्ही आम्हाला आपलेच वाटता. तुमच्या साध्या बोलण्यावरच श्रोते लोभावतात आणि सहज साध्या अभिनयावर

प्रेक्षक खूष होतात. पद्मश्री, पद्मभूषण, साहित्य परिषद, संगीत परिषद, सर्वांनी तुमचे गुणवर्णन करून तुम्हाला किताब दिले खरे पण तुमच्यामुळे त्या किताबांची किंमत वाढली त्याना “चार चांद लागले” हेच खरे. संगीताची आवड बालपणापासून जोपासलीत पण सीमित ठेऊन आपली प्रतिमा जोपासलीत. रेडिओ, टेलिव्हिजन सर्वांवर प्रभुत्व, पण अडकणे कुठेच नाही, कायम अलिप्त. लिखाणाचा पर्वत एकट्याने पेललात खरा पण प्रसंगी वाईटपणा घेऊन सुनीताने त्यासाठी वेळाचे नियोजन केले. कर्णाची दानशूरता भारतात गाजली, समाजासाठीची आपली दाने प्रसिध्दी पराङ्मुख राहीली. पुल तुम्हास लाभली सुनीता सारखी सहधर्मचारिणी, म्हणून तुमचे लिखाण झाले जनकर्णी. अथांग जनप्रेमाचे आपण झालात धनी, ती मात्र महान कार्य करून राहिली नामानिराळी. तुमचे लिखाण, संगीत, वक्तृत्व, अभिनय यांचा कस, जाणला तिने. आम्ही अनुभवले त्यांचे प्रयोग सकस. तुमचे कर्तृत्व जनात पसरले. लोकांना ते आवडले, आमचे ते भाग्य आम्ही आवडीने जपले. अथांग जनप्रेमाचे आपण झालात धनी, वंदन करते उभयतांना अल्पमती नलिनी!

**- नलिनी करंडे**